# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date – 17 February 2025

# Time 7.10 AM to 7.20 AM

# Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- वस्त्रोद्योग क्षेत्रातली निर्यात २०३० पर्यंत नऊ लाख कोटींपर्यंत नेण्याचं लक्ष्य असल्याचं पंतप्रधानांच प्रतिपादन
- नवी दिल्ली स्थानकावर शनिवारी झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेची उच्चस्तरीय समितीकडून चौकशी
- शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यास राज्य शासनाचं प्राधान्य, सीसीआयची कापूस खरेदी पुन्हा सुरू करण्यासाठी केंद्रीय मंत्र्यांशी चर्चा – मुख्यमंत्र्यांचं आश्वासन
- दोन दिवसीय मराठवाडा साहित्य संमेलनाची सांगता

आणि

- शिवजयंती निमित्त छत्रपती संभाजीनगर शहरात विविध कार्यक्रमांना सुरुवात

****

भारत जगातला सहावा सर्वात मोठा कापड निर्यातदार देश असून, २०३० पर्यंत या क्षेत्रातली निर्यात नऊ लाख कोटींवर घेऊन जाणं हेच आपलं लक्ष्य असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं आयोजित भारत टेक्स २०२५ मध्ये ते काल बोलत होते.

> ***''ये मिशन ग्रोथ के नये रास्ते खोल रहा है। आज हम दुनिया के छठे सबसे बडे टेक्स्टाईल और अप्रायजरल एक्सपोर्टर है। हमारा टेक्सटाईल निर्यात तीन लाख करोड रूपये तक पहूंच चुका है। अब हमारा लक्ष है, ट्वेंटी–थर्टी तक हम इसे नाईन लाख करोड रूपये तक लेकर जायेंगे।''***

गेल्यावर्षी आपण कापड उद्योगात फार्म, फायबर, फॅब्रिक, फॅशन आणि फॉरेन या पाच घटकांविषयी बोललो होतो, हे धोरण आता भारतासाठी महत्त्वपूर्ण झालं असून, यातून शेतकऱ्यांपासून ते व्यापाऱ्यांपर्यंत प्रगतीच्या नव्या वाटा मिळत असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. भारत टेक्स प्रदर्शनातून भारतीय संस्कृती आणि विकसित भारताच्या भविष्याचं चित्र दिसत असल्याचं, त्यांनी नमूद केलं.
भारत टेक्स हे आंतरराष्ट्रीय पातळीवरचं भव्य वस्त्रोद्योग प्रदर्शन असून, ते आजपर्यंत सुरू राहणार आहे. यामध्ये कच्च्या मालापासून ते तयार उत्पादनांपर्यंत विविध उत्पादनं आणि यंत्रसामुग्रीचा समावेश आहे.

****

नवी दिल्ली स्थानकावर शनिवारी रात्री झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत उत्तर रेल्वेचे मुख्य वाणिज्य व्यवस्थापक नरसिंह देव आणि मुख्य सुरक्षा आयुक्त पंकज गंगावार यांचा समावेश आहे. या समितीने स्थानकावरचे सीसीटीव्ही फूटेज राखून ठेवायचे निर्देश दिले आहेत. या घटनेत १८ जणांचा मृत्यू झाला, तर काही जण जखमी झाले.

****

नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या दुर्घटनेची बातमी दुःखद आणि वेदनादायक आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुःख व्यक्त केलं आहे. महाकुंभातून आणलेल्या गंगाजलाचा लाभ घेण्यासाठी नागपूरमधे आयोजित कार्यक्रमानंतर ते काल वार्ताहरांशी बोलत होते.

****

शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यास राज्य शासनाचं प्राधान्य असल्याचं, मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटलं आहे. जळगाव जिल्ह्यातल्या शेंदुर्णी इथं शेतकरी मेळाव्यात ते काल बोलत होते. वीज आणि पाणी यासंदर्भात शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यावर शासनाचा भर असून, सौर पंपासाठी पैसे भरलेल्या शेतकऱ्यांना पुढच्या १५ दिवसात आणि मागणी नोंदवल्या नंतर प्रत्येक शेतकऱ्याला दोन महिन्याच्या आत जोडणी देण्यात येईल, असं त्यांनी सांगितलं. शेतकऱ्यांची भारतीय कापूस महामंडळ – सीसीआयने बंद केलेली कापूस खरेदी पुन्हा सुरू करण्यासाठी केंद्रीय मंत्र्यांशी चर्चा केली जाईल, असं आश्वासनही फडणवीस यांनी दिलं. ते म्हणाले,

***''सीसीआयच्या खरेदीच्या संदर्भात तुम्ही सांगितलं. निश्चितपणे मी याच्यात लक्ष घालेन आणि स्वत: केंद्रीय मंत्र्यांशी बोलेन. आणि सीसीआयची थांबलेली खरेदी, ही तत्काळ आपण सुरु करु. शेतकर्याचा माल हा कुठल्याही परिस्थितीमध्ये त्याच्या घरी राहणार नाही, तो विकत घेतला जाईल, अशा प्रकारचा आमचा प्रयत्न असेल.''***

****

परिक्षा पे चर्चा कार्यक्रमाच्या कालच्या भागात अभिनेता विक्रांत मेस्सी आणि अभिनेत्री भूमी पेडणेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं. विद्यार्थ्यांनी चिंतामुक्त परीक्षा देण्यासाठी चांगला आराम करावा, नेहमी स्वतःमध्ये प्रगती करण्याचा प्रयत्न करत राहावा आणि केवळ उत्तीर्ण होण्यासाठी नाही तर ज्ञान प्राप्त करण्यासाठी अभ्यास करावा असा सल्ला, विक्रांत मेस्सी यानं दिला. त्यांनी पालकांना मुंलामुलांमध्ये स्पर्धा न करण्याचा, तसंच मुलांवर आपल्या अपेक्षा लादू नये, असं आवाहन केलं.

****

केंद्र सरकारच्या नेहरू युवा केंद्राचा 'मेरा युवा भारत' उपक्रम जळगाव इथं सुरू आहे. या उपक्रमाअंतर्गत आंतरजिल्हा युवा आदानप्रदान कार्यक्रमात मुंबईतल्या २७ युवक युवतींचा समावेश आहे. राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी काल या युवकांशी संवाद साधत जळगावच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि कृषि परंपरेची माहिती दिली.

****

छत्रपती संभाजीनगर नजीक वाळूज इथं ४४ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचा काल विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या उपस्थितीत समारोप झाला. साहित्य समाजाच्या व्यथा मांडत असतं, असं मत दानवे यांनी यावेळी व्यक्त केलं. ते म्हणाले,

***''खऱ्या अर्थाने साहित्य हे समाजाचा आरसा असतो, समाजाच्या व्यथा मांडतात. मग शेतकऱ्यांच्या असतील, कष्टकऱ्यांच्या असतील, माताभगिनींच्या असतील. इथं या सगळ्या व्यथा या साहित्य संमेलनानी व्यक्त केलेल्या असं मला वाटतं. मग शेतमालाच्या भावाचा प्रश्न असेल, महिलांवर होणारे अत्याचार असतील. किंवा या भागातील विकासाचे प्रश्न असतील. या भागातील शेतकऱ्यांना न***

***मिळणारं कर्ज असतील. या सगळ्या विषयाचा जर अभ्यास केला तर मला असं वाटतं की साहित्य सातत्यानं समाजाचा विचार करत असतं. समाजाच्या व्यथा मांडत असतं.''***

दरम्यान, या समारोप सत्रात यावेळी ११ विविध ठराव पारित करण्यात आले. मराठवाड्यातून जाणारे सर्व रेल्वे मार्ग दुहेरी करावेत, तसंच हे मार्ग रेल्वेच्या मध्य विभागाशी जोडण्यात यावेत, समन्यायी पाणी वाटपाच्या नियमानुसार मराठवाड्याला २२ टीएमसी पाणी प्रत्येक वर्षी विनाविलंब देण्यात यावं, शिक्षणात गळती निर्माण होईल अथवा शिक्षणाच्या प्रक्रियेतून आर्थिक दुर्बल घटक वंचित राहतील अशा प्रकारची धोरणं शासनाने राबवू नयेत, राजकीय नेत्यापर्यंत पोहचलेली गुंडगिरी आणि राजकारण्यांचा पक्षपातीपणा संपवण्याची मागणी, आदी ठरावांचा यात समावेश आहे.

यावेळी प्राचार्य प्रतापराव बोराडे, न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर, कादंबरीकार रा. रं. बोराडे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या संमेलनात झलेल्या परिसंवाद, कथाकथन, बालकुमार मेळाव्याला रसिकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

****

शिवजयंती निमित्त छत्रपती संभाजीनगर शहरात विविध कार्यक्रमांना कालपासून सुरुवात झाली. यात शहरातल्या सर्व पुतळ्यांची साफसफाई जिल्हा शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आली, तसंच सायकल रॅली काढण्यात आली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने क्रांती चौकात शिवकालीन शस्त्र प्रदर्शन भरवण्यात आलं होतं. यानिमित्त शिवकालीन शस्त्र आणि संस्कृती तसंच त्यांनी केलेली युद्धनीती याबद्दल आबालवृद्धांना माहिती मिळाली. आज याठिकाणी शिवकालिन मैदानी खेळांचं प्रात्यक्षिक दाखवण्यात येणार आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर इथं वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयाचं उद्घाटन काल मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरुण पेडणेकर यांच्या हस्ते झालं. हे न्यायालय सुरू झाल्यामुळे पक्षकारांना भूसंपादन आणि कौटुंबिक न्यायालयीन प्रकरणांसाठी धाराशिव जिल्हा न्यायालयात जाण्याची गरज राहिलेली नाही, असं पेडणेकर यावेळी म्हणाले.

****

नांदेडहून आयोध्येला दर्शनासाठी जात असलेल्या भाविकांच्या टेम्पो ट्रॅव्हलरचा उत्तर प्रदेशातल्या बाराबंकी जिल्ह्यात लोणीकटरा इथं अपघात होऊन, चार जणांचा मृत्यू झाला, तर १६ जण जखमी झाले. काल पहाटेच्या सुमारास या टेम्पो ट्रॅव्हलरने रस्त्याच्या कडेला नादुरुस्त असलेल्या एका बसला धडक देऊन हा अपघात झाला. मृतांमधले तीघे जण नांदेड इथले, तर एक जण हिंगोली इथलं रहीवाशी होते.

****

लातूर जिल्ह्यात मुरूड इथं काल दुपारी चालकाचा स्कॉर्पिओ गाडीवरचा ताबा सुटल्यानं ती रस्त्याच्या बाजूला असलेल्या उपहारगृहात घुसून झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला, तर सात जण जखमी झाले. ही गाडी पुण्यावरून लातूरला लग्नासाठी जात होती. वेगात आलेल्या गाडीनं छोटी संरक्षण भिंत तोडून उपहारगृहातल्या ग्राहकांना चिरडलं.

****

मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसांचा कृती आराखड्याअंतर्गत परभणी पोलीस दल सात कलमी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करत आहे. याअंतर्गत काल पोलीस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातल्या काही पोलीस स्टेशन आणि परिसराची स्वच्छता करण्यात आली.

****

छत्रपती संभाजीनगर इथं साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा आणि परिसर सुशिभिकरणाच्या कामाचं भुमिपूजन काल पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते झालं. इतर मागासवर्ग कल्याण आणि दुग्धविकास मंत्री अतुल सावे, मनपा आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत यावेळी उपस्थित होते.

****

नांदेड इथं रेल्वेमार्ग विस्तारीकरणाच्या कामांमुळे आजपासून येत्या तीन मार्च पर्यंत काही रेल्वेगाड्या काही दिवशी रद्द करण्यात आल्या आहेत. परभणी–नांदेड एक्स्प्रेस १९, २०, २२, २३, २६, २७ फेब्रुवारी तसंच एक आणि दोन मार्च या दिवशी रद्द करण्यात आली आहे. तर नांदेड – औरंगाबाद एक्स्प्रेस २१ आणि २८ फेब्रुवारी रोजी रद्द करण्यात आल्याची माहिती दक्षिण मध्य रेल्वेनं दिली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर नजिक वाळूज इथल्या श्रीनाथ कॉलेज ऑफ फार्मसी, हायटेक महाविद्यालय परिसरात काल पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा घेण्यात

आला. या मेळाव्यात ४७९ उमेदवारांची निवड करण्यात आल्याची माहिती, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्तांनी दिली.

****

धाराशिव जिल्ह्यात कळंब तालुक्यातल्या खामसवाडी शिवारात अवैध गांजाच्या झाडाची लागवड करुन संवर्धन करणाऱ्या शेतकऱ्यावर पोलीसांनी कारवाई केली. यावेळी एकूण ३४७ किलो २८० ग्रॅम वजनाची गांजाची झाडं जप्त करण्यात आली.

****